ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : खरें प्रायश्चित्त
अथवा मानवोद्धाराचा खरा उपाय

प्रकाशक : बॉम्बे ट्रॅक्ट अॅण्ड बुक सोसायटी, बॉम्बे

प्रकाशन वर्ष : १९१५

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर
अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रुपांतर - २०२३

# THE TRUE ATONEMENT.

# खरें प्रायश्चित्त.

## (अथवा मानवोद्धाराचा खरा उपाय.)

BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.

14 th Edition 5000 Copies, A. D. 1915.

*Revised by the Rev. R. A. Dhawle.*

अहमदनगर एथें मिशन छापखान्यांत छापिलें.

Printed at the S. P. G. Mission Press, Ahmednagar.

Price ½ Anna. किंमत अर्धा आणा.

Printed by Rev. Wm. Manton, Curator,
S. P. G. Mission Press, Ahmednagar.
and
Published by Rev. James Smith,
for Tract and Book Society, Kalbadevi Road, Bombay.

# THE TRUE ATONEMENT.

# खरें प्रायश्चित्त.

## जगांत पाप आहे.

या जगांतील सर्व धर्मशास्त्रांत पाप दूर करण्याचे कांहींना कांहीं तरी उपाय सांगितलेले आहेत; आणि सर्व देशांतील लोक आपापला धर्म खरा मानून त्या उपयांची योजना करीत असतात. यावरून पाप सर्व मानवांचे ठायीं असून तें दूर केल्याशिवाय परमेश्वराची कृपा व्हावयाची नाहीं अशी सर्वांची खातरी असते असें पदोपदीं स्पष्ट आढळून येतें.

पाप सर्वांच्या ठिकाणीं आहे; पापामुळेंच परमेश्वराचा रोष मनुष्यांवर होतो, आणि त्या पापाबद्दल आपण क्षमा मिळविणार नाहीं, तर परिणामीं परमेश्वराचा आपणावर क्रोध होऊन आपण नरकदंडास पात्र होऊं असें सर्व कबूल करितात. परंतु अडचण जी कांहीं आहे; ती हीच कीं, पापापासून आपला सुटका कशी करून घ्यावयाची? व देवाचा क्रोध शमवून त्याची कृपा कशी मिळवायाची? याविषयीं मात्र निरनिराळ्या लोकांचीं निरनिराळीं मतें असतात.

## पाप घालविण्याचे परस्पर विरोधी उपाय.

कोणी ह्मणतात, केवळ स्नान केल्यानें पाप नाहींसें होतें, पण दुसरे ह्मणतात कीं, स्नानानें अंग मात्र स्वच्छ होतें; कोणी ह्मणतात, मूर्त्तिपूजा ही पापमुक्त होण्याचें साधन आहे, पण उलट पक्षीं दुसऱ्या पुष्कळ लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, मूर्त्तिपूजक परमेश्वराचा अपमान करून त्याजपासून भ्रष्ट होतात व त्यांच्या पापांत आणखी भर पडते. तीर्थयात्रा केल्यानें मनुष्याचें पाप नष्ट होतें असें कित्येकांचें ह्मणणें आहे, पण दुसरे ह्मणतात कीं, तीर्थाटनानें शरीराचे हाल होऊन पैशापरी पैसा जातो, एवढेंच नव्हें, तर ज्या पापाच्या निमित्तानें एवढे कष्ट केले व एवढा पैसा ओतला तें पाप कायमचें कायम राहतें. कारण ह्मटलें आहे कीं. "तीर्थी जाऊनी कुडी कुडे, मन तैसेंचि कोरडें" कोणी ह्मणतो, सर्वसंगपरित्याग करून गिरिकंदरीं तपश्चर्या करीत बसल्यानें पाप जातें; त्यास दुसरा ह्मणतो, जो आपलें घरदार बायको पोरें यांस निराधार टाकून अरण्यांत जाऊन बसतो तो दुप्पट पाप करतो, कारण धर्मपत्नी ह्मणून परमेश्वरासमक्ष ज्या स्त्रीचा त्यानें हात धरिला तिचें रक्षण करावें तें न करितां तो तिला सोडून पळतो. परमेश्वरानें दिलेल्या आपल्या सोन्यासारख्या मुलांबाळांचें संगोपन करावें, त्यांना सन्मार्ग दाखवावा, त्यांस ईश्वरभजनीं लावावें, तें न करितां तो त्यांस सर्वथैव अनाथ अशीं सोडून केवळ स्वार्थाच्या मागें लगतो. इतरांचें त्यानें कल्याण करावें या

हेतूनें परमेश्वरानें त्याला जी बुद्धि आणि सामर्थ्य दिलें असतें, त्याजकडे दुर्लक्ष करून दुसऱ्यांच्या जीवावर आपलें पोट भरूं पाहतो; एवढेंच नव्हे, तर आपल्या बायकांपोरांसही दारोदार भिक्षा मागावयास लावून परावलंबी करितो. "भिक्षापात्रीं अवलंबणें जळो जिणें लाजीरवाणें." कोणी ह्मणतात कीं देहदंडन केल्यानें पाप भस्म होतें, यावर त्यांस दुसरें असें उत्तर देतात कीं, या उपायानें शरीरास मात्र व्यर्थ शीण होतो, आणि देवाचा क्रोधही मनुष्य आपणावर ओढून घेतो. कारण परमेश्वरानें मनुष्याला हात पाय वगैरे जे अवयव दिले आहेत, ते त्यानें छिन्नविछिन्न, विद्रुप अथवा निरूपयोगी करावे या हेतूनें दिले नसून त्या अवयवांची निगा ठेवून त्यांची यथायोग्य वाढ व्हावी, त्यांच्या द्वारें परोपकार घडावा, इतरांचें कल्याण करण्यांत त्यांचा उपयोग व्हावा ह्या हेतूनें दिलेले आहेत. अर्थात् देहदंडन करून जो मनुष्य आपलें शरीर विरूप व निरुपयोगी करितो तो देवाच्या दृष्टींत अघोर पातक करितो; आणि शेवटीं आपल्या आत्म्याचाही सर्वस्वी नाश करून घेतो. कोणी ह्मणतात, पंचगव्यानें मनुष्याच्या पातकाचा नाश होतो, तेव्हां गाईपासून उत्पन्न होणाऱ्या दह्यादुधांत अथवा मळमुत्रांत एवढें अजब सामर्थ्य कोठून? त्यांच्यामध्येंच हे गुण कोठले? ही योग्यता त्यांच्यांत कोणाच्या किंवा कशाच्या प्रभावानें आली? इत्यादि प्रश्न विचारणारेही कांहीं थोडे थोडके आढळून येत नाहींत. उपोषण केल्यानें देहाची पापापासून सोडवणूक होते असें कोणी ह्मणतात परंतु लागलेंच, उपास तापास केल्यानें शरीराला

यातना होतात, प्राण कासावीस होतात खरें, पण पाप कसें नष्ट होतें? असें विचारणारा पुढें येऊन उभा राहतो कोणी ह्मणतात, पशुयज्ञ केल्यानें पापाचा नाश होतो, त्यास दुसरे ह्मणतात, बिचाऱ्या मुक्या जनावरांचा प्राण घेतल्यानं पशुहत्येचें पाप घडतें; एवढेंच नव्हे, तर त्या पशूंचा शापहा लागतो.

## पापरूप रोगाला खरा वैद्य मिळाला नाहीं.

या प्रकारें पाप घालविण्याचे परस्परविरोधी निरनिराळे उपाय निरनिराळे लोक सांगत असतात. कोणत्याही उपायांत निश्चितपणा आढळून येत नाहीं, किंवा त्यांतून एखादा योजून पाहावा असें मनाला वाटत नाहीं. यावरून साहजिक असा प्रश्न निघतो कीं, या भ्रामक कल्पना कोठून आल्या? अथवा असे भलभलते उपाय सांगण्यास काय कारण पडलें? याला उत्तर ह्मणजे मनुष्यांमधील अज्ञान आणि गर्व हीं होत. ह्या दोन गोष्टीमुळें हा सर्व घोंटाळा माजून राहिला आहे. उदाहरणार्थ, अशी कल्पना करा कीं, कोणा एका मनुष्याला अकस्मात् कांहीं रोग जडला, तेव्हां जवळच असलेल्या एका वैद्याला त्यानें बोलावूं पाठविलें. वैद्य महाराज घरीं आले आणि त्यांनीं रोगाची चिकित्सा चालविली, पण त्या रोगाचा त्यांना कांहीं थांग लागेना. रोग मला कळत नाहीं असें स्पष्ट कबूल करायाला वैद्य महाराजांचा हिय्या होईना; आपली फजीती कशी करून घ्यावी असें त्यांना साहजिक वाटलें, ह्मणून त्या भीतीमुळें ह्मणजे गर्वामुळें कांहीं

तरी उपाय सांगून त्यांनीं वेळ मारून नेली. औषध पाठविलें पण त्याचा यत्किंचितही फायदा झाला नाहीं. उलट रोग्याचा रोग दुणावला. तेव्हां अर्थात त्या रोग्यानें दुसऱ्या एका वैद्यास बोलावूं पाठविलें, या राजेश्रीनांही रोग कळेना, पण गर्व त्यांनाही आपलें अज्ञान पदरीं घेऊं देईना, ह्मणून त्यांनींही आपलें भलतेंच एक औषध चालूं केलें; पुढें कांहीं गुण पडत नाहींसें पाहून तिसरा वैद्य बोलावला, पण तोही तसाच. चवथा आला, आणि तोच प्रकार.—या प्रकारें त्याला कांहीं दुर्धर रोग झाला आहे हें सर्व वैद्यांस कळत होतें, परंतु उपाय मात्र कोणता योजावा हें त्यांपकीं कोणालाही ठाऊक नव्हतें. तेव्हां प्रत्येकानें आपली निरनिराळीं औषधें दिलीं. पण गुण ह्मणून आला नाहीं, पापरूप रोगाची अगदीं हीच स्थिति. हा रोग सर्वांना जडला आहे हें सर्व मनुष्यांस कळतें, पण त्याला औषध कोणतें लागूं पडतें? कोणत्या उपायानें रोग नष्ट होईल? हें मात्र जगांतील कोणाही मानवाला कळालेलें नाहीं. जो तो माझाच उपाय खरा ह्मणून पुढें आला, पण रोग मात्र कोणाचा बरा झाला नाहीं.

## देवच खरा वैद्य

या सर्व गोष्टींवरून मनुष्यांच्या मनामध्यें असा विचार यावयाचा होता कीं, पापरूप रोगाची चिकित्सा करण्याचें सामर्थ केवळ देवालाच असावें, आणि त्यालाच खरा उपाय ठाऊक असावा; घड्याळ बिघडलें तर घड्याळजीच तें नीट करील, तें सुताराकडे नेलें, तर सुतार त्याला

काय करणार? तसेंच मेज मोडलें, तर सुतारच तें दुरुस्त करणार; शिंपी मेजाला काय करील? ह्याच न्यायानें मनुष्य बिघडला, त्याची मूळस्थिति मोडकळीस आली, तर मनुष्य त्याला काय उपाय योजणार? देवालाच उपाय योजिला पाहिजे आणि तोही त्याला सर्व प्रकारें शोभेल असा असणें अवश्य आहे. तर मग देवाला कोणता उपाय शोभतो? ज्या उपायानें त्याचें गौरव होईल, ज्या उपायानें संपूर्ण जगत् त्याचें ऐश्वर्य मान्य करील व ज्याच्याद्वारें संपूर्ण मानवजातीचें कल्याण होईल तोच उपाय खरा होय.

## देव जसा दयाळू तसा न्यायीही आहे.

देवाचा स्वभावच असा आहे कीं, ज्या प्रकारें अग्नि आणि पाणी, अथवा अंधार आणि प्रकाश एके ठिकाणीं राहूं शकत नाहींत त्याप्रकारें देवाला पाप बिलकुल खपत नाहीं. पाप्याला त्याच्या पापाबद्दल दंड केल्यावांचून तो कधींही स्वस्थ राहणार नाहीं. "जो जीव पाप करील तो मरेल" अथवा त्याला दंड होईल असें परमेश्वरानें स्पष्ट रीतीनें प्रगट केलें आहे. त्यानें मनुष्याचेठायीं बुद्धि आणि सदसद्विवेक हीं ठेविलीं आहेत व पाप हें अत्यंत हीन आणि अमंगळ असल्यामुळें त्याला पापाचा स्पर्श होतांच लाज वाटूं लागते, आणि परिणामीं आपणाला या पापाबद्दल दंड भोगावा लागेल याची त्याला भीति वाटूं लागते; आणि या दोन्ही भावना—लज्जा व भीति—देवानें मनुष्याचे अंतःकरणांत कांहीं विशिष्ट हेतूनें घातल्या आहेत यांत तिळ-

मात्र संशय नाहीं. देव मनुष्याचा उत्पन्नकर्त्ता आहे ह्मणूनच त्याला जसें त्याचें सुख दुःख कळतें तसें दुसरे कोणालाही कळणें अशक्य होय. याच कारणास्तव त्यानें एखाद्या अत्यंत मायाळू बापाप्रमाणें मनुष्याला कांहीं आज्ञा देऊन ठेविल्या आहेत. तरी पण मानवी बापाप्रमाणें तो केवळ मायाळू नसून अत्यंत न्यायीही आहे. दया आणि न्याय हीं त्यामध्यें पूर्णपणें वसत आहेत. ह्मणूनच मनुष्यानें जर देवाची आज्ञा मोडली आणि देवानें आपल्या वचनाप्रमाणें त्याला दंड न केला तर देवाकडे लबाडी आली असती. पण अशी गोष्ट कालत्रयीं होणें नाहीं. त्याचें वचन जर खोटें ठरतें तर त्याचा काय मान राहता? त्याच्या राज्याची थोरवी काय राहती? ह्याचें अंमळ अधिक स्पष्टीकरण करणें आवश्यक दिसतें. अशी कल्पना करा कीं, जर देवानें पापाबद्दल मनुष्यास दंड केला नसता तर देवाला पापाचा अत्यंत तिटकारा आहे असें जें सांगितलें आहे, तें आपलें कांहीं तरी थोतांड आहे असें मनुष्यास सहज वाटण्याचा संभव आहे. कारण जो जीव पाप करील त्याला दंड होईल असें स्पष्टपणें सांगूनही तो जर दंड करीत नाहीं, तर दंड करण्याचा त्याचा अद्याप निश्चय झाला नसावा, तो निश्चय होईल तेव्हां होईल; तेव्हां आपण कां स्वस्थ बसावें? आपणही पापांतील सौख्य भोगून घ्यावें, ज्या अर्थी, त्यानें इतर लोकांच्या पापाकडे दुर्लक्ष केलें, त्या अर्थी आपल्याही पापाकडे तो कानाडोळा करील, असें जगांतील सर्व लोकांस वाटलें असतें. तेव्हां अर्थात् देवाला कोणी मान दिला नसता, कोणाच्याही मनामध्यें त्याची

भीति राहिला नसती. मनुष्य उन्मत्त होऊन दिवसानुदिवस केवळ पशुतुल्य झाला असता.

या कारणास्तव, जर देव न्यायी आहे, तर त्यानें पापाबद्दल दंड केलाच पाहिजे. आज्ञा देते वेळींच त्या मोडल्याबद्दल आपण दंड करण्याचा निश्चय केला आहे असें त्यानें स्पष्ट दर्शविणें अगत्य आहे. आकाश आणि पृथ्वी लयास जातील पण त्याचें वचन केव्हांही ढळत नाहीं अशी सर्व मनुष्याची पूर्ण खातरी झाली पाहिजे. तो पवित्र, न्यायी आणि खरा आहे, हें स्पष्ट झालें पाहिजे. पाप किती भयंकर, त्याची फळ किती कडू, त्याचा परिणाम केवढा अघोर हें सर्व मनुष्यांच्या दृष्टीसमोर नित्य असलें पाहिजे. ह्मणूनच ज्या उपायांत पापाला अघोर दंड सांगितला आहे आणि ज्यांत ईश्वर अत्यंत पवित्र, न्यायी आणि खरा असून पाप त्याला मुळीं खपत नाहीं असें स्पष्ट दिसून येतें, तोच उपाय खरा, तोच उपाय देवाला शोभतो आणि त्याच उपायानें मानवाचें तारण होणें शक्य आहे.

## मानवी उपाय देवाच्या न्यायाला शोभत नाहींत.

आतां वर जे पाप जाण्याचे उपाय सांगितले आहेत ते ह्या कसोटीला लावून पहा. ते उपाय परम पवित्र अशा देवाला शोभतात काय? अथवा तेणेकरून मानवांचा खरोखरच उद्धार होण्याचा संभव आहे कीं काय? याचा विचार करून पहा. उदाहरणार्थ, पंचगव्यानें पाप नष्ट होतें असें ह्मटलें, तर कोणत्याही विचारी मनुष्याची कल्पना काय

होईल? त्याची समजूत काय पडेल? देवाची आज्ञा हवी त्या वेळीं मोडावी, त्याचा वाटेल तेवढा अवमान करावा आणि पंचगव्य स्वीकारावें, ह्मणजे झालें. गोमूत्र प्राशन केल्यावर देवाचें आपण काय लागतो? असें तो ह्मणणार नाहीं काय? असा उपाय देवाला शोभतो काय? यांत देवाचें गौरव होतें काय? पापाचा यत्किंचित् तरी भयंकरपणा यांत दिसून येतो काय? अगदीं नाहीं. उलट अशा क्षुल्लक उपायांनीं पाप नाहींसें होतें अशी जर मनुष्याची एकदा पक्की समजूत झाली, तर तो काय अनर्थ करील याचा विचार देखील करवत नाहीं. चोरी, मारामारी, खून, व्यभिचार इत्यादि जीं अत्यंत निंद्य पापें आहेत त्यांची या जगांत रेलचेल उडून जाइल, देवाचा पदोपदीं अपमान होईल, मनुष्यें झाडून सर्व स्वच्छंदी बनतील, सारांश, हें जग प्रतिनरकच बनेल. चोरी करावी, आणि सत्यनारायणाची थाटाची पूजा मांडावी, खून करावा, आणि गोमयाचे दोन चार घांस खावे, परस्त्रीगमन करावें, आणि गोमूत्र प्राशन करावें, यथेच्छ दारू पिऊन गटरांत पडावे आणि सकाळीं गंगेंत स्नान करावें. गोमयादिकांना तोटा नाहीं आणि गंगाही सर्वत्र उफळून वाहत असते. असा उपाय सांगणारा देव यदाकदाचित् या जगांत एखादे वेळीं दृष्टीस पडेल, तर ज्यांचा तेणकरून अन्याय घडला असेल, ज्यांची चोरी झाली असेल, ज्यांचे प्रियजन ठार झाले असतील, ज्यांच्या स्त्रिया भ्रष्ट झाल्या असतील ते त्याला काय करतील याचा विचार करावयालाच नको. नाहीं;

देव असे उपाय केव्हांही सांगणार नाहीं. त्रिवार नाहीं. असले उपाय सांगणारा मानवांचा घातक आणि देवाचा शत्रु सैतानच होय.

## असले उपाय मानवी राज्यांत देखील चालणार नाहींत.

एवढें कशाला? खुद्द जगांतीलच गोष्ट घ्या. सरकारचे कायदे मोडले, राजाचा अपमान केला, तर अशा प्रकारच्या एखाद्या उपायानें त्या गुन्ह्यांचें निरसन होईल काय? चोरी करून मी नाशकास जाऊन आलों आहें असें ह्मटलें, तर फौजदार हातकडीं घालण्याचें सोडून देईल काय? खून करून मी महिनाभर गोमय खात आहें असें ह्मटलें, तर फाशी चुकेल काय? विश्वासघात करून मी रोज रामनामाचा जप करीत असतों, असें ह्मटलें तर सरकार कबूल करील काय? निदान ज्यांचा अन्याय घडला असेल ते किंवा त्यांचे आप्तेष्ट शांत होतील काय? अशा सरकाराला कोणीही जुमानणार नाहीं. त्या राजाची आज्ञा कोणी पाळणार नाहींत आणि त्यानें नेमलेल्या अधिकाऱ्यांचीही कोणी परवा करणार नाहींत. असे प्रकार ज्या राज्यांत चालूं होतील तें ओट घटकाही टिकणार नाहीं. केव्हां केव्हां एखाद्या मनुष्याकडून असा कांहीं भयंकर गुन्हा घडून आला असतो कीं, सरकार त्याला केवळ देहान्त प्रायश्चित्त देऊन स्वस्थ बसत नाहीं. तेवढी शिक्षा पुरी आहे असें मानीत नाहीं; तर त्या अपराधाबद्दल पूर्ण भरपायी करून घेण्याकरितां मागाहून त्याची स्थावर जंगम मिळकत देखील सरकार जप्त करून घेतें; आणि त्याच्या पोरां-बाळांसही त्याच्या पापानें प्रायश्चित्त भोगावें लागतें.

आतां विचार करण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, मनुष्याची म्हणजे राजाची आज्ञा जर एखाद्यानें मोडिली, तर इतकें भयंकर प्रायश्चित्त भोगावें लागतें; पण देव जो राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभु त्याची आज्ञा मोडली, तर त्याला केवढें घोर प्रायश्चित्त असावें? देव श्रेष्ठ किंवा मनुष्य श्रेष्ठ? राजाचा अपराध केला तर मोठें पाप होतें किंवा देवाचा अपराध केला तर मोठें पाप होतें? राजापेक्षां देवाघरचा मनुष्य कितीतरी पटीनें अपराधी ठरतो! ज्याचा अपराध आपण करितों त्याच्या कमी अधिक योग्यतेवर व मोठेपणावर त्या अपराधाबद्दलची शिक्षा अवलंबून असते. ईश्वराची सत्ता अपार आहे, तो परम श्रेष्ठ आहे, तो ह्या निःसीम विश्वाचा व आपला उत्पन्नकर्त्ता आहे; एवढेंच नव्हे, तर तो नित्य आपलें पालन पोषण करून आपणावर प्रेमळ पित्याप्रमाणें प्रीति करितो; तर ज्या आपल्या स्वर्गीय पित्यानें आपणावर अगणित उपकार केले आहेत व प्रत्यहीं करीत आहे त्या ईश्वराचा अपराध करणें, त्याविरुद्ध बंड करणें म्हणजे अपराधाचा—पापाचा कळस नाहीं का झाला? हे कोण आश्चर्य! कीं, मनुष्याविरुद्ध केलेल्या अपराधाबद्दल एखाद्यास देहान्त दंड देखील अपुरा समजतात आणि परम पवित्र, परम श्रेष्ठ असा जो राजांचा राजा, प्रभूंचा प्रभू—परमेश्वर, त्याचा अपराध केला, तर थोडासा पैसा खर्चल्यानें अथवा अंगावर पाणी घेतल्यानें अथवा गोमय भक्षिल्यानें पूर्ण प्रायश्चित्त घडतें! परमेश्वर मनुष्यांपेक्षां नीच झाला काय? मनुष्याला देखील शोभणार नाहीं असा त्याचा अपमान

व्हावा काय? असे ह्मणणाऱ्यांना ईश्वर ह्मणजे काय, याची मुळीं कल्पनाच नसावी असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

## उपाय कसा असावा.

वर सांगितलेले उपाय देवाला केव्हांही शोभणार नाहींत. त्या उपयानीं पाप ह्मणजे कांहीं विशेष भयंकर गोष्ट आहे अशी मनुष्याची केव्हांहीं कल्पना होणार नाहीं. ईश्वर ह्मणजे मानवांना पोरखेळ वाटेल आणि त्यांच्या वर्त्तनाला कसलाही आळा राहणार नाहीं. असल्या क्षुल्लक उपायांनीं त्याची केवळ निंदा आणि चेष्टा होण्याचा संभव आहे. मानवांमध्यें धरबंध ह्मणून कोणत्याही प्रकारचा राहणार नाहीं. आणि पापवृत्तीलाही पूर्ण मोकळीक दिल्यासारखें होईल यावरून उघड उघड दिसतें कीं, हे उपाय देवानें केव्हांही सांगितले नसावेत.

पापाच्या निरसनार्थ प्रत्येक जो उपाय आपणापुढें येईल, त्यांत ह्या तीन विशिष्ट महत्वाच्या गोष्टींची योजना झाली आहे किंवा नाहीं हें प्रत्येक पापी मनुष्यानें लक्षपूर्वक पाहिलें पाहिजे. खऱ्या प्रायश्चित्तांत ह्या तीन गोष्टी असणें ह्मणजे अत्यंत महत्वाची गोष्ट होय. त्या तीन गोष्टी कोणत्या ह्मणाल, तर:--१ ली. **देवाचें गौरव.** २ री. **या जगतांतील सर्व मानवांचें नियमन किंवा आकलन.** आणि ३ री. **मनुष्यमात्रांचें कल्याण.** वरील उपयांमध्यें या तिन्ही गोष्टींपैकीं एकही नाहीं. पापाबद्दल क्षमा मात्र प्राप्त झाली

ह्मणजे तेणेंकरून मनुष्याचें कल्याण होईल असें नव्हे, तर त्याच्या मनांत पापाचा अत्यंत वीट उत्पन्न झाला पाहिजे, पापाचें भयंकर स्वरूप त्याला कळून आपल्या अंतःकरणांत त्याला यत्किंचितही थारा न देण्याचा निश्चय त्यानें करावा; पापाकडे जी साहजिक ओढ असते ती समूळ नष्ट झाली पाहिजे; ह्मणजे सारांश त्याचें अंतःकरण शुद्ध झालें पाहिजे. वरील उपायांनीं या गोष्टी होणें अगदीं असंभवनीय आहे. एवढ्या क्षुल्लक उपायांनीं जर पाप नष्ट होतें, तर पापही त्याचप्रमाणें क्षुल्लक असावें असें मनुष्य ह्मणतील व पापाबद्दल यत्किंचित भीति त्यांचे मनांत उत्पन्न होणार नाहीं.

मनुष्याच्या मनांत पापाबद्दल भीति उत्पन्न होण्यास त्याला त्याबद्दल दंड झाला पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. दंड करूं नये असें ह्मणावें, तर खऱ्या उपायांत ज्या तीन गोष्टी अवश्य असल्या पाहिजेत असें ह्मटलें आहे त्यांपैकीं पहिल्या दोन गोष्टी नष्ट होतील, ह्मणजे तेणेंकरून देवाचें गौरव होणें शक्य नाहीं व मनुष्यांमध्येंही धर्मबंध न राहतां जिकडे तिकडे अव्यवस्था माजून राहील. उलट पक्षीं दंड करावा असें जर ह्मणावें तर त्या उपायांतील तिसऱ्या गोष्टीला धक्का पोहोंचतो कारण पापाबद्दल जो काहीं दंड योग्य आहे, तो भयंकरच असला पाहिजे. राजा जर यःकश्चित अपराबद्दल मनुष्यांस कडक शासन करितो, तर त्या न्यायानें मनुष्याला, देवाचा अन्याय केल्याबद्दल, त्याच्या आज्ञा मोडल्याबद्दल सदासर्वकाळ नरकामध्यें यातना भोगीत ठेवणें योग्यच होईल. परंतु तेणेंकरून मनुष्यांचें कल्याण झालें असें

म्हणतां येणार नाहीं व देवाचा अत्यंत प्रेमळ स्वभावही त्यांत प्रगट होणार नाहीं. ईश्वर न्यायी आहे आणि दयाळूही आहे असें वर सांगितलेंच आहे, म्हणून ईश्वर जर मनुष्यास त्याच्या पापाबद्दल शासन करणार नाहीं, तर त्याच्या न्यायाला बाध येतो, त्याकडे लबाडी येते; पण त्यानें शिक्षा करावी, तर त्याच्या प्रेमळ आणि दयाळू स्वभावाला बाध येतो.

## देवाचा न्याय आणि दया यांचा मेळ.

तेव्हां या परस्पर विरोधी गोष्टींचा मेळ कसा बसावयाचा याचा आपण विचार करूं. ईश्वर पूर्ण न्यायी आणि पूर्ण दयाळू आहे, असें ज्या उपायांत दिसून येईल तोच उपाय खरा. असा उपाय आहे. त्या उपायांत देवाचें गौरव कायम राहून पापी मानवांचें आकलनही होतें, आणि शेवटीं त्यांचें कल्याण जें व्हावयाचें तेंही होणें पूर्णपणें शक्य आहे. त्या उपायाच्या द्वारें पापाबद्दल दंड होऊन त्याबद्दलची क्षमाही त्यांस प्राप्त होतें. देवाला पापाचा केवढा वीट आहे हें दिसून येतें आणि पाप्यांविषयींचें त्याचें अत्यंत प्रेमही त्यांत प्रगट होतें. देव पूर्ण पवित्र, न्यायी आणि खरा आहे हें त्यांत आढळून येतें आणि तो परम दयाळू आणि कृपाळू आहे हेंही स्पष्ट होतें. आतां तो आश्चर्यकारक उपाय कोणता आहे हें सांगतों.

सर्व मनुष्यें पापी आहेत. पुण्यवान असा एकही मनुष्य नाहीं; एवढेंच नव्हे, तर पापी मनुष्यांतील एकालाही योग्य प्रायश्चित्त करणें

शक्य नाहीं. त्यामुळें मनुष्यमात्र ईश्वराच्या दंडास आणि नरकवासास योग्य आहेत हें जेव्हां देवानें पाहिलें तेव्हां त्याला त्यांचा अत्यंत कळवळा वाटला, त्यांना नरकांत ढकलणें त्यास बरें वाटलें नाहीं. म्हणून आपल्या अपार दयेनें त्यांचें तारण करण्याच्या हेतूनें त्यानें एक आश्चर्यकारक उपाय योजिला.

"देवानें मनुष्यांवर एवढी प्रीति केली कीं, त्यानें आपला एकुलता पुत्र (त्यांसाठीं) दिला." त्यानें या जगामध्यें येऊन सर्व मानवांच्या पापासाठीं प्रायश्चित्त केलें व पुढें अशी योजना केली कीं, "जो कोणी त्याजवर विश्वास ठेवील त्याचा नाश होऊं नये तर त्याला सार्वकालिक जीवन (प्राप्त) व्हावें."

देवाची मनुष्यमात्रावर एवढी प्रीति आहे कीं, त्यानें आपला एकुलता एक पुत्र—त्यानें त्या सर्वांच्या पापाकरितां प्रायश्चित्त करावें म्हणून—जगांत पाठविला. त्यांच्या पापांसाठीं आपल्या पुत्रानें दंडाची भरपायी करावी, अनंत दुःखें भोगावीं आणि शेवटीं त्याच निष्पाप निष्कलंक पुत्रानें त्यांच्याबद्दल देहान्त प्रायश्चित्त करावें असें त्यानें आपल्या अनंत सूत्रानुसार ठरविलें. या योजनेला पुत्राचीही पूर्ण संमति होती. पितापुत्राची इच्छा या कार्यांत पूर्णपणें एक होती. प्राचीन काळीं पुत्रानें आपल्या एका भविष्यवाद्याच्या तोंडून वदविलेंच होतें कीं, "पहा मी आलों आहें. पुस्तकाच्या गुंडाळींत मजविषयीं लिहिलें आहे—तुझा मनोदय पूर्ण करण्यांत माझा संतोष आहे."

निर्बुद्ध पशु सबुद्ध मनुष्याच्या पापांकरितां मरून काय होणार? प्रत्यहीं असंख्य बलि दिले आणि रात्रंदिवस अखंड यज्ञ याग केले, तरी मानवी पापाचें प्रायश्चित्त केव्हांही होणार नाहीं. त्याला सबुद्ध, निष्पाप, निष्कलंक असा मनुष्यच अवश्य होता. तसा मनुष्य या जगांत निपजणें ह्मणजे अगदीं असंभवनीय आणि अशक्य गोष्ट होय. ह्मणून देवाचा पुत्रच मनुष्य झाला. त्यानें एका कुमारीच्या उदरीं मानवी देह धारण केला. सुमारें तेहतीस वर्षें त्यानें या पृथ्वीवर वस्ती केली, आणि त्यानें आपला सर्व काल लोकांचें बरें करण्यांत वेंचला. देवाची इच्छा काय आहे हें तो लोकांस सांगत असे. देवाचें शुभ-वर्तमान त्यानें या जगाला कळविलें आणि जें कांहीं पुण्य करणें अवश्य होतें तें त्यानें पूर्णपणें साधलें. एवढें करूनही त्यानें आपलें सर्व आयुष्य केवळ दुःखांत घालविलें. पदोपदीं लोक त्याचा अपमान करीत. तो जिकडे जाई तिकडे त्याची चेष्टा आणि हेटाळणी होत असे. नसते दोष लोक त्याच्या पदरीं घालीत असत. सारांश, तो मूर्त्तिमंत दुःख असा या जगांत राहून शेवटीं क्रूस ह्मटलेल्या तत्कालीन वधस्तंभावर नाना प्रकारच्या यातना व क्लेश भोगून मनुष्यमात्रांच्या पापांसाठीं मरण पावला. मानवांसाठीं आपण स्वतः बलि झाला. त्यांच्या पापासाठीं आपल्या स्वतांचा यज्ञ केला. पुढें रीतीप्रमाणें त्याला श्मशानांत कबरेंत ठेविलें असतांना तो तीन दिवसांनीं जीवंत होऊन मेलेल्यांमधून पुनः उठला व त्यानें प्रायश्चित्ताचें कार्य तडीस नेलें. पुनः उठल्यानंतर चाळीस दिवसपर्यंत निरनिराळे ठिकाणीं

आणि निराळे प्रसंगीं तो आपल्या शिष्यवृंदास दर्शन देत असे आणि शेवटीं चाळिसावे दिवशीं त्यांच्या समक्षच तो सदेह स्वर्गीत गेला. सध्यां तो स्वर्गीत असून मानवांकरितां आपल्या पित्याजवळ अखंड मध्यस्थी करीत आहे त्याच्या मध्यस्थीचा सारांश हाच आहे कीं, "हे पित्या, जगामधील सव मनुष्यें पापी आहेत खरीं, परंतु मीं त्यांच्या सर्वांच्या पापांसाठीं प्रायश्चित्त केलें आहे; त्यांच्याठायीं पुण्याचा लवलेश जरी नाहीं तरी त्यांना पुरून उरें इतकें पुण्य मा साधिलें आहे, ह्मणून जे कोणी पापग्रस्त मजवर विश्वास ठेवून तुझ्याजवळ क्षमेची याचना करितील त्यांस ती तूं दे. माझें पुण्य त्यांना तू भरपूर दे व इतःपर त्यांनीं नवीन जिण्यानें चालावें ह्मणून त्यांवर आपल्या अनुग्रहाची वृष्टि कर व शेवटीं त्यांच्या मरणानंतर ज्या सौख्यांत व गौरवांत आपण राहत आहों त्यांत त्यांनींहि वाटेकरी व्हावें ह्मणून त्या सर्वांना या स्थळीं घेऊन ये."

## देवाचा पुत्र ह्मणजे कोण?

आतां कोणी असा आक्षेप घेतील कीं, देवाला पुत्र कसा होइल? त्यालाही तुह्मी प्रपंचांत ओढूं पाहतां काय? यावर आमचें असें ह्मणणें आहे कीं, देवाचा पुत्र असें ज्या व्यक्तीसंबंधानें ह्मटलें आहे ती व्यक्ति ऐहिक अर्थाप्रमाणें देवाचा पुत्र नाहीं. देवासंबंधींच्या गोष्टी ऐहिक भाषांनींच सांगितल्या पाहिजेत. त्याला दुसरा उपाय नाहीं. ह्मणून "देवाचा पुत्र" ह्या शब्दाचा खरा अर्थ काय आहे

हें सांगणें अवश्य आहे. "जीवंत आणि सत्य असा एकच देव आहे; तो सनातन, अशरीर, निर्विभाग व निःक्षोभ आहे; त्याची शक्ति, बुद्धि व चांगुलपण अनंत आहेत. तो सर्व दृश्य व अदृश्य वस्तूंचा कर्त्ता व रक्षक आहे. ह्या ईश्वरत्वाच्या एकतेंत एका तत्वाच्या, शक्तींच्या आणि सनातनत्वाच्या अशा तीन व्यक्ति आहेत, ह्मणजे पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा" अशा आहेत. पुत्राला पित्याचा शब्द असेंही ह्मटलें आहे; तो अनादिकालापासून पित्याच्या तत्वांतून उद्भवला आहे, तरी तो नव्हता, असा एकही काल नव्हता. तो वास्तविक सनातन देव आहे आणि पित्याशीं एका तत्वाचा आहे, पवित्र आत्मा पिता व पुत्र यांपासून निघतो. ह्या तिघांवांचून देवत्व पूर्ण होत नाहीं. शरीर व आत्मा मिळून जसा मनुष्य होतो, तसें पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा मिळून एक देव होय. ह्या तीन्ही व्यक्ति अनादि आहेत, त्या केव्हांही उत्पन्न झाल्या नाहींत किंवा त्या एकामागून एक झाल्या असाव्यात असेंही ह्मणतां येत नाहीं. जसा पित्याला आरंभ नाहीं तसा पुत्राला नाहीं व पवित्र आत्म्यालाही नाहीं आणि ह्या तिघांनांही अंत नाहीं. तिघांचे गुण, प्रताप, राज्य, आणि गौरव एकच आहेत. मानवांच्या तरणोपायांत ह्या तिघांचेंही अंग जरी आहे, तरी त्यांचीं भिन्न भिन्न कार्यें सांगितलीं आहेत. मानवांचें तारण व्हावें ह्मणून देव जो पिता यानें पुत्राला जगांत पाठविलें, देव जो पुत्र त्याप्रमाणें देह धारण करून पूर्ण प्रकारें मनुष्य झाला आणि त्यानें आपल्या अंगीं सर्व प्रकारचीं दुःखें भोगून आपला

प्राण देऊन मानवांच्या पापासाठीं प्रायश्चित्त केलें; आणि देवत्वांतील तिसरी व्यक्ति ह्मणजे देव जो पवित्र आत्मा हा मानवी अंतःकरणांत प्रवेश करून त्यांमधून सर्व दुर्गुण काढून तीं शुद्ध करितो; एवढेंच नव्हे, तर मनुष्याचेठायीं भिन्न भिन्न प्रसंगीं भिन्न भिन्न प्रकारें प्रेरणा करून त्यांची या जगतांतील यात्रा संपेपावेतों त्यांना पवित्र आणि शुद्ध करून स्वर्गाच्या राज्यांत देवासहित निरंतर राहण्यास त्यांची सिद्धता करीत असतो. अशा प्रकारें देव जो पिता याची प्रीति, देव जो पुत्र याचें प्रायश्चित्तानें पुण्य व मध्यस्थी आणि पवित्र आत्म्याची प्रेरणा व अनुग्रह हीं मानवांच्या तारणास अवश्यक आहेत. यांच्या वांचून त्यांचें तारण होणें नाहीं. इतरत्र उपाय नाहीं आणि उपायाचा संभवही नाहीं.

आतां हा जो तरणोपाय वर सांगितला आहे तो देवाला वास्तविक प्रकारें शोभतो किंवा नाहीं हें पाहावयाचें आहे. वर स्पष्ट सांगितलेलेंच आहे कीं, खऱ्या तरणोपायांत तीन गोष्टी अवश्य असल्या पाहिजेत. १. ली, तेणेंकरून देवाचा महिमा आणि गौरव व्हावा. २. री, त्या उपायानें मनुष्यमात्रांच्या मनांत पापाबद्दलची भीति उत्पन्न होऊन त्यांना कांहीं बंधारण लागावें आणि ३. री, त्यांचें अनंत कल्याण व्हावें.

## खऱ्या तारणापायांत देवाचें गौरव आहे.

१. मनुष्यांचे तारण व्हावें ह्मणून ईश्वर आपला एकुलता एक पुत्र देत आहे. यांत त्याचें गौरव आहे कीं निंदा आहे? यांत त्याचा महिमा स्पष्ट होतो किंवा त्याचा हलकेपणा दिसून येतो? यांत तो पवित्र दिसतो, कीं अपवित्र दिसतो? न्यायी दिसतो, कीं अन्यायी दिसतो? खरा व सत्यप्रिय दिसतो, कीं लबाड व कपटी दिसतो? ज्ञानी कीं अज्ञानी, दयामय किंवा निघृण दिसतो? पापी मनुष्यासाठीं देवानें आपला प्रिय एकुलता एक पुत्र द्यावा यांत त्याची केवढा दया दिसून येते! पापाबद्दलचा दंड पूर्ण भरून पाप्यांचें तारणही व्हावें, पापाबद्दलचा अत्यंत वीट प्रगट करून पाप्यांवरची आपली दया प्रगट करावी यांत त्याचें केवढें अगाध ज्ञान दिसून येतें! "जो जीव पाप करील त्याला मी दंड करीनच करीन" असें जें विधान ज्यानें केलें होतें त्यानें आपल्या पुत्राला बलि देऊन त्या विधानाला बाध येऊं दिला नाहीं, यांत त्याचा केवढा खरेपणा दिसून येतो! पापाला शासन झाल्यावांचून राहणार नाहीं हें खरें करून दाखविण्यांत तो केवढा न्यायी असावा असें दिसून येतें बरें! तसेंच आपला प्रिय पुत्र पाप्यांबद्दल जामीन झाला असतां याच्या द्वारें पूर्ण भरपायी करून घेण्यासाठीं त्याला निर्लज्ज मरणानें देखील मरूं द्यावें यांत पापाबद्दलचा त्याचा केवढा भयंकर वीट दिसून येतो! त्याची केवढी प्रखर पवित्रता प्रगट होतें! देवानें पापी मानवांकरितां आपला एकुलता एक पुत्र देण्याचा जो उपाय योजिला त्यांत त्याचे सर्व दैवी गुण ह्मणजे त्याचे

अगाध ज्ञान, प्रखर पवित्रता, न्याय, सत्याची आवड आणि निःसीम प्रेम इत्यादि सर्व संपूर्ण तेजानें प्रगट होतात, ह्मणजे अर्थात् या उपायांत त्याचें गौरव कायम राहतें व त्याच्या महिम्यालाही यत्किंचित कमीपणा येत नाहीं.

### खऱ्या तरणोपायानें देवाची भीति उत्पन्न होती.

२. तरणोपायामधील तीन अटीं पैकीं पहिली अट या उपायामध्यें आहे हें स्पष्ट झालें. आतां दुसरी अट त्यांत पूर्ण होत आहे किंवा नाहीं हें आपण पाहूं. मनुष्यांच्या पापांबद्दल प्रायश्चित्त व्हावयासाठीं देवानें आपला एकुलता एक पुत्र दिल्यानें मनुष्यजात आवरली जाऊन तिच्यामध्यें कांहीं बंधारण राहील किंवा नाहीं हा प्रश्न आहे. त्याचप्रमाणें ह्या सदरहु गोष्टीची त्यांच्या मनांत खातरी पटली ह्मणजे ते पाप करण्यास प्रवृत्त होतील किंवा परावृत्त होतील? पाप त्यांना क्षुल्लक वाटेल कीं भयंकर वाटेल? ईश्वराला पापाचा अत्यंत वीट आहे असें त्यांस आढळून येईल, कीं पाप ह्मणजे कांहीं क्षुल्लक गोष्ट आहे असें त्यास वाटत असावें असें ते ह्मणतील? पापाबद्दल दंड करण्याचा त्याचा निर्धार झाला आहे असें ते ह्मणतील, कीं अद्याप त्याच्या मनांत त्यासंबंधानें विचार चालला आहे अशी त्यांची समजूत होईल? कारण पापाबद्दल शासन करण्याचें देवानें अद्याप मनांत आणिलें नाहीं, त्याला पापाबद्दल फारसा वीटही वाटत नाहीं आणि ती आपली एक सर्व साधारण क्षुल्लक गोष्ट आहे अशी जर एकदा मनुष्याच्या मनाची खातरी झाली, तर पापासंबंधांनें त्यांच्या

मनांत बिलकुल भीति राहणार नाहीं व ते कोणत्याहीं प्रकारें आटोपले जाणार नाहींत, हें उघड उघड कोणीही सांगेल. परंतु हा उपाय त्यांना एकदा कळला ह्मणजे पापाबद्दलची त्यांची कल्पना सर्वथैव निराळी होईल. पापाबद्दल प्रायश्चित्त करण्याकरितां मानवांनीं जे अनेक उपाय केले ते व्यर्थ ठरून खुद्द देवाला आपला एकुलता पुत्र पाठवावा लागला यावरून पाप ह्मणजे कांहीं विलक्षण प्रकारें भयंकर असावें असें त्यांना वाटणार नाहीं काय? आह्मीं हजारों प्रायश्चित्तें केलीं, आह्मी आपल्या शरीरास नाना प्रकारचे क्लेश आणि यातना दिल्या, किंवा खुद्द आह्मीं आपले प्राणही त्याजपुढें सादर केले, तरी आमच्या पापाचा एक अंशही नष्ट होत नाहीं, यावरून पाप किती अनर्थकारक आणि अघोर असावें अशी त्यांची खातरी होणार नाहीं काय? कारण केवळ मनुष्यांच्या दुःखांनीं ह्मणजे त्यांनीं हत्या तथा यातना भोगल्यानें पाप जर नाहींसें होतें, तर देव आपला एकुलता पुत्र अनंत दुःखें भोगण्यास व शेवटीं आपला प्राणही त्या कार्यीं खर्चिण्यास केव्हांही न पाठविता. परंतु देवाचा पुत्र आपलें सर्व वैभव व सौख्य सोडून या जगांत मनुष्य होऊन आला व त्यांतच त्यानें अगदीं नीच आणि कंगाल स्थितींत तेहतीस वर्षें घालविलीं आणि शेवटीं अनेक प्रकारचे हाल व अपेष्टा भोगून मरण पावला आणि पापाचें भयंकर आणि घोर स्वरूप त्यानें मानवांस दाखविलें. तेव्हां अर्थात् मनुष्यें आपल्या मनांत ह्मणतील कीं, "पापाबद्दल जर खुद्द देवाच्या पुत्राला एवढा भारी दंड भरावा लागला, तर आह्मी

आणखी पाप करण्यास कसें धजावें? एकदा त्यानें आपल्या परम प्रसादानें आपला पुत्र आमच्या पापासाठीं दिला, परंतु आपण जर पुनः पुनः पाप करूं तर तो पुनः दुसऱ्यानदा आपला पुत्र देईल असा तिळमात्र संभव नाहीं. मानवी पापाबद्दल आपला प्रिय पुत्र जामीन झाला, ह्मणून तो दंड भरून घेतां राहिला, अशी जर गोष्ट नाहीं, तर खुद्द हट्टानें पापांत लोळणारांस तो कसा सोडील? ज्यानें पुत्रास देखील मरतांना पाहिलें तो आह्माला सोडील काय?" या कारणास्तव आह्मी ह्मणतों कीं, या दुसऱ्या अटीच्याद्वारें मनुष्यमात्रांत पापाचें मोठें भय उत्पन्न होईल आणि अर्थात् तेणेंकरून त्यांचें आकलन होऊन ते धरबंधानें राहतील.

## खऱ्या उपायांत मानवांचें कल्याण आहे.

३. देवानें सिद्ध केलेल्या तरणोपायांत त्याचें गौरव आणि मनुष्यमात्रांचें आकळण या दोन अटी आहेत असें आतां स्पष्ट झालें. ह्याच्या नंतर तिसरी जी अट, ह्मणजे मानवांचें खरें कल्याण, तींत पूर्ण होतें किंवा नाहीं हें पाहावयाचें राहिलें आहे. देवाच्या पुत्रानें मनुष्यांच्या पापाबद्दल प्रायश्चित्त केलें ह्मणून त्या प्रायश्चित्ताच्या बळावर त्यांस आपल्या पापांची क्षमा प्राप्त करून घेतां येते यांत त्यांचें कल्याण आहे किंवा नाहीं? मानवांच्या पापामुळें देवाचा जो क्रोध त्यांनीं आपणावर ओढून घेतला तो देवपुत्राच्या पुण्यद्वारें शांत होऊन उलट त्यांचेवर देवानें कृपा करण्याचा मार्ग सिद्ध झाला ह्मणून त्यांचें हितच झालें. पुढें आह्मी स्वतः पाप घालविण्याचे लाखो उपाय केले ते सर्व

व्यर्थ होत, असें जेव्हां मनुष्यांच्या दृष्टीस येतें तेव्हां सर्व अभिमान आणि गर्व हरण होऊन त्यांचठायीं नम्रता उत्पन्न होऊं लागत यांत त्यांचे कल्याणाचा संभव नाहीं काय? देवानें आपल्या परम दयेनें आपण होऊन आह्मासाठीं हा तरणोपाय सिद्ध केला आहे हें लक्षांत आणून मनुष्य त्याचें महदुपकार आठवितील व त्याचें गौरव करितील, हें त्यांच्या धन्य चेंच आहे कीं नाहीं? एवढेंच नव्हें; तर आमचा उद्धार व्हावा ह्मणून आपला एकुलता एक पुत्रही जो देव आमच्या-साठीं देता झाला—स्वपुत्रासारखं महान दानही ज्यानें आमच्यापासून राखिलें नाहीं—तो आमच्या हितार्थ इतर दानें देण्यांत कमी करील काय? अशी मनुष्याची खातरी होऊन देवाचे ठायीं मनुष्याचा पूर्ण भरंवसा आणि विश्वास जडल, यांत त्यांचे कल्याण नाहीं असें कोण ह्मणेल? त्याच प्रकारें देवानें आपला प्रिय पुत्र आह्माला देण्यात ज्या अर्थीं एवढी प्रीति प्रगट केली त्या अर्थीं आह्मीही त्याची प्रत्येक आज्ञा शिरसावंद्य मानून ती पाळण्यास मागें पुढ करूं नये अशी भावना त्यांच्यामध्यें उत्पन्न झाली, तर त्यांचें अहित होईल काय! नव्हे, त्यांचें केवळ हितच त्यांत होणार. याशिवाय वरील सर्व गोष्टी मनुष्यांच्या अंतःकरणांत चांगल्या ठसाव्या व त्यांची यथायोग्य समजूत पडावी ह्मणून त्याच आपल्या पुत्राच्या पुण्यामुळें तो त्यांला आपल्या पवित्र आत्म्याचें दान देता; आणि पवित्र आत्मा त्यांच्या अंतर्यामीं वस्ती करून त्यांच्या मधाल सर्व दुर्गुण नाहींसे करितो आणि आपल्या अनुग्रहाच्या सामर्थ्यानें दिवसानुदिवस त्यांला शुद्ध आणि

पवित्र आचरणी करून देवासहवर्त्तमान राहण्यास त्यांस योग्य करितो, व सरते शेवटीं त्यांच्या मरणानंतर देव त्यांना आपल्या सन्निध घेऊन त्यांना अनंत कालापावतों आपल्या सौख्याचे व गौरवाचे सहभागी करितो यांत त्यांचें कल्याण तें आणखी काय व्हावयाचें आहे?

तर मग खऱ्या तरणोपायांत ज्या तीन गोष्टी अवश्य असाव्यात असें ह्मटलें होतें त्या सर्व या उपायांत आहेत हें सिद्ध झालें. तेणें-करून देवाचें गौरव होतें, मनुष्यमात्रांचें आकलन होऊन तीं सुव्यव-स्थित जिण्यानें चालूं लागतात व शेवटीं त्याच उद्धारमार्गाच्या द्वारें त्यांचें अनंतकालचें कल्याण होतें. यावरून देवानेंच हा उपाय सिद्ध केला आहे यांत तिळमात्र संदेह राहत नाहीं. तोच खरा, उत्तमोत्तम आणि मनुष्याच्या उद्धारार्थ सर्वथैव योग्य आहे. तोच आपण स्वीकारावा आणि तेणेंकरूनच आपण आपलें तारण साधून घ्यावें. त्याशिवाय इतर मार्ग नाहीं.

## इतर उपायांत ह्या गोष्टी नाहींत.

१. तरी पण ह्या जगांत जे इतर मार्ग सांगितले आहेत ते निरर्थक आहेत असें सिद्ध केल्यावांचून खऱ्या तरणोपायाची किंमत कळावयाची नाहीं; या कारणास्तव त्या इतर उपायांची आणि वरील खऱ्या तरणोपायाची तुळना करून पाहूं या. कोणी पंचगव्याचा उपाय सांगतात, कोणी उपोषणाचे प्रायश्चित्त सांगतात, कोणी गोदान, कोणी दक्षणा इत्यादिकांच्या मार्ग सांगतात आणि कोणी तर देहान्त

प्रायश्चिताच्या उपयांचेंही प्रतिपादन करीत अ तात. तर या उपयांवरून दवाचे कोणते गुण प्रगट होतात? त्यांच्यामध्यें कसलें ज्ञान, कसली पवित्रता, कसला उदात्तपणा अथवा कोणत्या प्रकारची दया आढळून यंत? त्यांच्यामध्यें पापाला सर्वथैव योग्य असे शासन नाहीं; आणि देवाची दयाही त्यांच्या द्वारें प्रगट होत नाहीं. सर्वांत कठीण प्रायश्चित्त ह्मणजे देहान्त प्रायश्चित्त सांगितलें आहे; तरी पण वर स्पष्ट सिद्ध केलें आहे कीं, केवळ देहान्त प्रायश्चित्तानें राजाविरुद्ध केलेल्या अपराधाचें देखील पुरतेसें प्रायश्चित्त होत नाहीं. तेव्हां देवाविरुद्ध केलेल्या असंख्य अपराधांचें तेणेंकरून यथायोग्य प्रायश्चित्त कसें होणार? जर खुद्द जीवाची आहुति दिल्यानें पापाबद्दलचें योग्य प्रायश्चित्त घडत नाहीं, तर गोमय भक्षण, उपोषण, द्रव्यदान इत्यादि उपायांचें नांव देखील काढावयास नको. अशा कोणत्याही प्रायश्चित्तानें पूर्ण दंड होत नाहीं, देवाची दया दिसून येत नाहीं किंवा त्याचे इतर कोणते ही गुण प्रगट होत नाहींत. लोकांचे प्राण घेण्यांत दया ती कसली? गोमलभक्षणांत चांगुलपणा कोठला? फुकट गायी घेण्यांत काय औदार्य आढळून येतें? या उपायांत कांहीं ह्मणण्यासारखें ज्ञान तरी दिसून येतें काय? त्यांत कोणाची थोरवी होते? कोणाला मान मिळतो? उलट पक्षीं देवाच्या पुत्रानें पापाबद्दल प्रायश्चित्त करावें यांत देवाचा न्याय, त्याची दया, ज्ञान, पवित्रता इत्यादि सर्व गुण अत्यंत तेजानें प्रकाशित होतात.

२. देवाच्या पुत्रानें मानवांच्या पापाबद्दल प्रायश्चित्त केल्यामुळें मानवांचें यथान्याय अनुशासन होणें शक्य आहे वरील क्षुल्लक उपायांनीं त्यांचें कोणत्या प्रकारें नियमन होईल? कारण प्रत्येक मनुष्य दुसऱ्याचें उदाहरण पाहून ह्मणूं लागेल कीं, हा गोमय भक्षण करून तरला, तो उपोषण करून तरला, अमका गोदानानें मुक्त झाला, तमका देहान्त प्रायश्चित्त करून उद्धरून गेला, तर मलाच कांहीं उपाय करतां येणार नाहींत कीं, काय? मीं हवीं तेवढीं पापें केलीं तरी उपाय माझ्या स्वाधीनचे आहेत. मला हवें तर मी थोडेसें गोमय भक्षीन, अथवा चार दोन दिवस उपास करीन, खूपशी दक्षिणा देईन, ह्मणजे झालें. तरी यदाकदाचित एवढ्यानें पुरें होणार नाहीं, तर अग्निकाष्ट भक्षीन किंवा जलसमाधि घेईन, ह्मणजे तरी सर्व पापांपासून मुक्त होऊन मला सौख्यलोक लाभेल ना? असल्या माणसाला तुह्मी काय कायदे सांगणार? कोणतें बंधारण लावणार? तुमचें यथाशास्त्र अनुशासन तो मान्य करील काय?

३ देवाच्या पुत्रानें मनुष्यांच्या पापाकरितां प्रायश्चित्त व्हावें यांतच मनुष्यांचें अनंत कल्याण आहे. देवानें आपला प्रिय पुत्र आह्मासाठीं दिला यावरून त्याची निःसीम दया दिसून येते आणि त्याच कारणामुळें त्याजविषयींचें प्रेम त्यांच्या मनामध्यें उत्पन्न होतें. उलटपक्षीं त्यानें गोमयादिकांचा उपाय सांगितला असता तर तो अमंगल भासता आणि मनुष्यें अर्थात् त्याचा वीट मानूं लागतीं. पापाच्या प्रायश्चित्तासाठीं देव आह्माला गोमल भक्षण करावयास सांगतो, आमच्या यांसी

मागतो आमचें द्रव्य घेऊं पाहतो किंवा आपले प्राण तरी द्या असें ह्मणतो, ह्मणून लोक त्याचे उपकार स्मरतील काय? त्यांच्या अंतःकरणांत त्याच्या संबंधानें यत्किंचित तरी प्रेम उत्पन्न होईल काय? पापाचें निरसन करण्यास देवानें आपला प्रिय पुत्र पाठविला ह्या विचारानें मनुष्य नम्र होतो, पण पाप दूर करण्याचें जे कांहीं उपाय करावयाचें ते देवानें माझ्याकडे सोंपिले आहेत अशा विचारानें त्याच्या मनांत केवळ गर्व मात्र उत्पन्न होईल. देवानें आह्माला जीं कांहीं कर्त्तव्यें सांगितलीं तीं सर्व आह्मीं केलीं, त्याची नोकरी जेवढी आह्मी बजवायाची होती तेवढी आह्मी बजाविली, तर्व्हां त्यानें आमचें प्रतिफळ—आमचें इनाम आह्माला द्यावें असें हे स्वतः उपाय करणारे अभिमानानें आपल्या मनांत ह्मणूं लागतील.

### या उपायानें देवावर भरवसा उत्पन्न होतो.

देवानें आपला प्रिय पुत्र देखील आह्मासाठीं दिला, यावरून गरज पडल्यास तो आह्माला दुसऱ्याही चांगल्या देणग्या देईल असा भरंवसा ठेवण्यास सुलभ पडतें. जो पुत्राला जगांत पाठविण्यास सिद्ध झाला, तो आह्माला स्वर्गांत आपल्या सहित राहावयास घेऊन जाईल असा विश्वास धरण्यास स्थल होत. परंतु जो आह्माला गोमय खावयास सांगतो अथवा पाण्यानें स्नान करा असें ह्मणतो अथवा झाडाला प्रदक्षिणा घालीत राहा किंवा दगडाचे सोहाळे मांडून त्याची पूजा करीत जा अशी आज्ञा देतो तो आह्माला अनंतकालापावेतों स्वर्गसुख देईल असा भरंवसा कोण देऊं शकेल? देवाच्या ऐहिक

देणग्यांमध्यें कांहीं विशेष आश्चर्यकारक नसलें तर पारलौकिक देणग्या आह्माला मिळतील अशी आशा करण्यास काय आधार राहणार? इहलोकीं तो आह्मास गोमयादिक वस्तु खावयास देऊन परलोकीं मी तुह्माला अपार सौख्य देईन असें जर ह्मणेल तर तो आमची निवळ चेष्टा करीत आहे असें आह्माला वाटेल. ज्याच्याठायीं केवळ कवड्या देण्याचें सामर्थ्य दिसून येतें तो जर मी तुह्माला मोहरा देईन असें ह्मणूं लागला तर त्याचा भरंवसा कोण धरील? तो आपली चेष्टा करीत आहे असें लोक ह्मणणार नाहींत काय? गोमयादिकांचा उपाय करणारांनीं त्यांच्या संबधानें खरोखर लक्षपूर्वक विचार केला असतां ह्या सर्व गोष्टी त्यांना पटतील. यांच्यापेक्षां निराळा आणि उदात्त उपाय आहे असें जोंपावेतों त्यांच्या लक्षांत येणार नाहीं तों पावेतों देवावर खरा विश्वास ठेवणें ह्मणजे काय, हें त्यांना कळावयाचें नाहीं; निदान देवाकडे त्यांचा ओढा लागणार नाहीं, किंवा नम्र होऊन देवाचे आपल्यावरचे अनंत उपकार स्मरावयाचें देखील त्यांच्या ध्यानीं मनीं येणार नाहीं. आपल्या पुण्यावर अवलंबून ते अभिमानी बनतील अथवा आयते वेळीं त्यांची अत्यंत निराशा होऊना आपल्या प्राक्तनाला दोष देत बसतील.

## केवळ पश्चात्ताप किंवा नामस्मरण व्यर्थ होत.

"पश्चात्तापेन प्रायश्चित्तं" पुष्कळांचें मत असें आहे कीं, पश्चात्तापच प्रायश्चित्त होय. इतर कांहीं धर्मकृत्य करण्याचें अगत्य नाहीं. पश्चात्तापानें अंतःकरणाची शुद्धि झाली ह्मणजे पुरें आहे. परंतु निदान

कोणत्याही राज्यांत अशी समजूत असलेली ऐकिवांत नाहीं. चोरानें चोरी करावी आणि पुढें पोलीस त्याला पकडून बिन भाड्याच्या घरांत सरकारचा पाहुणचार घ्यावयास नेऊं लागले, ह्मणजे ह्मणावें "महाराज मीं हें जें कर्म केलें तें फार वाईट केलें, पुनः मी असें कधीं करणार नाहीं, मला पूर्ण पश्चाताप झाला आहे." अशानें पोलीस किंवा सरकार त्याला तत्काळ सोडून देतील काय? किंवा एखाद्यानें सरकारापसून तगाई मागून घेतली आणि पुढें ह्मणूं लागला कीं, मीं हें जें सरकारचें कर्ज काढलें तें फार वाईट केलें, मी पुनः केव्हांही तगाई मागणार नाहीं; मला पश्चात्ताप होतो असें त्यानें ह्मणतांच सरकार त्याला मुक्त करील काय? त्याचें कर्ज फिटल्यासारखें होईल काय? अशा सरकारांत कोण कोणाचा बोज राखील? असें सगळ्यानांच तें सोडून देऊं लागलें, तर त्याच्या आज्ञा कोण पाळील? एखाद्या राजानें जर आपल्या राज्यांत द्वाही फिरविली कीं, "माझ्या राज्यांत जो कोणी चोरी करील त्यानें पश्चाताप मात्र करावा ह्मणजे त्याला माफी होईल, अथवा जो कोणी ऋण काढील त्यानें पुढें पश्चात्ताप पावून पुनः ऋण न काढण्याचा निश्चय केल्यास मी त्याला ऋणमुक्त करीन;" तर त्याचें राज्य किती दिवस टिकेल? थोडक्याच दिवसांमध्यें त्यांत केवढा गोंधळ माजून राहील? परंतु कोणताही राजा असें करणार नाहीं याची खातरी आहे. तर मग, असा प्रश्न निघतो कीं, जर राजानें अशी मूर्खपणाची द्वाही फिरवूं नये, तर देवानें असें करावें कीं काय?

राजानें आपल्या प्रजेची अधिक चौकशी करावी, कीं देवानें आपल्या सृष्टीची अधिक चौकशी करावी? राजानें आपल्या राज्यांतील गुन्हेगारांचा अधिक वीट मानावा, कीं देवानें पापाचा अधिक वीट मानावा? देवानें पापाबद्दल अगत्य शासन करावें आणि दया करण्यासारखा कोणी योग्य असेल तर त्यावर अवश्य दया करावी. तरी पण अशी कल्पना करा कीं, एखाद्या मनुष्याला आज आपल्या दुर्वर्त्तनाबद्दल खरोखर पश्चात्ताप घडला आणि पुढें मी कधींही पाप करणार नाहीं असा त्यानें निश्चय केला आणि त्या निश्चयाप्रमाणें त्याचें मरणा पावेतों वर्तन झालें, ह्मणून तो मागील पापांपासून मुक्त झाला कीं काय? महिन्याचा करार करून पंधरा दिवसच जर कोणी काम करील, तर भरमहिन्याचा पगार त्याला कोण देईल? आजपासून पुण्य कराल, पण मागील पापाचें काय? आजपासून ऋण ह्मणून काढायाचें नाहीं, पण मागील कर्ज कोण फेडणार? देवाच्या अनुग्रहाशिवाय कोणालाही खरा पश्चात्ताप होत नाहीं. तथापि त्या अनुग्रहाशिवाय एखाद्याला अगदीं खरा खरा पश्चात्ताप घडला अशी अल्पना जरी केली, तरी तो कदाचित् पुढें चांगला होईल, पुढें पुण्य करील. परंतु मागील पापाला प्रायश्चित्त हवें आहे किंवा नाहीं? त्या पापांला देवाच्या पुत्राच्या प्रायश्चित्ताची गरज आहे; त्यावांचून त्याची क्षमा होणें नाहीं खरी गोष्ट अशी आहे कीं, देवाची मनुष्यमात्रावरील मोठी दया लक्षांत आल्यावांचून, कोणालाही खरा पश्चात्ताप व्हावयाचा नाहीं. दंडाच्या भयानें अथवा सुखाच्या लोभानें झालेला पश्चात्ताप

खोटा असून निरर्थक आहे. देवानें पंचगव्यादि उपाय सांगितले, नाना प्रकारचीं क्रिया कर्मे आज्ञापिलीं, क्षुल्लक गोष्टी करण्यास सांगितल्या किंवा कठीण कर्त्तव्यें मनुष्यांवर लादलीं तरी त्याचें प्रेम ह्मणून त्याच्यानें आपणाकडे आकर्षवणार नाहीं. देवानें पापी मानवांच्या उद्धारासाठीं आपला प्रिय पुत्र दिला या सुवार्तेनें त्याच्यासंबंधीं जेवढें प्रेम मानवांमध्यें उत्पन्न होईल तेवढें दुसरें कशानेंही होणें शक्य नाहीं. तीच प्रीति त्याच्याठायीं पश्चात्तापाला कारण होते, आणि तोच केवळ खरा पश्चात्ताप असतो. मनांतलें मनांत केवळ मनोवृत्तींच्या गडबडीनें खरा पश्चात्ताप होत नाहीं. कारण पापाचरणानें मनुष्यांमधील सदसद्विवेक मंद झाला असतो, चांगलें करण्याचें सामर्थ्य नष्ट झालें असतें. तो पापाचा दास बनला असतो. एखाद्या घातक व्यसनाला बळि पडलेल्या मनुष्याची आणि त्याची स्थिति सारखी असते, हजारो सबबी सांगून तो जें करावयाचें तें करील. मनामध्यें मरणांतिक वेदना झाल्या, तरी त्याला स्वतांला सुधारण्याचें सामर्थ्य नसतें. पण पवित्र आत्म्याचें साहाय्य, ह्मणजे त्याचा अनुग्रह असल्यावांचून पश्चात्ताप शक्य नाहीं. देवाच्या पुत्रानें प्रायश्चित्त केलें—त्यानें पुण्य साधिलें—ह्मणून देव पवित्र आत्मा आह्माला देतो. दुसऱ्या कोणत्याही उपायानें त्याचें साहाय्य ह्मणजे पवित्र आत्म्याचा अनुग्रह आह्माला लाभला नसता.

नामोच्चरणाचा उपाय कोणी सांगतात नामोच्चारानें पापांच्या राशींच्या राशी भस्म होतात असें ह्मटलें आहे. परंतु माझ्या आह्मा

मोडणारांनी केवळ माझ्या नामाचा उच्चार केला, तर मी त्यांना क्षमा देईन असा मूर्खपणाचा जाहीरनामा एखादा राजा आपल्या राज्यांत प्रसिद्ध करील काय? असलें राज्य एक दिवस टिकावयाचें नाहीं. तरी पण, देवानें हा नामोच्चरणाचा उपाय सांगितला आहे असें म्हणणें म्हणजे त्याच्या पदरीं केवढा मूर्खपणा बांधणें आहे बरें! देवानें असला उपाय सांगणें अशक्य—अगदीं अशक्य—होय. उलट पक्षीं त्याची अशी आज्ञा आहे कीं, "जो कोणी माझें नांव व्यर्थ घेतो म्हणजे माझ्या संबंधानें पूज्यबुद्धि नसतां व मजवर भक्ति नसतां विनाकारण केवळ वर वर ओंठीं माझ्या नामाचा जो कोणी उच्चार करील त्याला शासन झाल्यावांचून राहणार नाहीं."

## ख्रिस्ताचेंच पुण्य मागावें.

तर मग मित्रांनो, पाप घालविण्याचे जगांतील सर्व उपाय व्यर्थ आहेत. देवाचा पुत्र येशू ख्रिस्त यानें जें प्रायश्चित्त केलें तेंच बरें. त्यानेंच केवळ मानव तरतील. तुम्हाला त्याच्या पुण्याचें अत्यंत अगत्य आहे. तें ईश्वराजवळून तुम्ही मागून घ्यावें. त्याच्या वरच तुम्ही सर्व हवाला टाकावा. आम्हामध्यें कांहीं पुण्य नाहीं किंवा तें मिळविण्याचें सामर्थ्य आमच्या ठायीं नाहीं असें देवापाशीं प्रामाणिकपणानें कबूल करावें. येशू ख्रिस्ताचें पुण्य जो देवापुढें मांडील त्याचीच प्रार्थना देव ऐकेल. या जगांतच त्याचें पुण्य मागून घेतलें पाहिजे. मरणानंतर तें मागतां येणार नाहीं व मिळणारही नाहीं; म्हणजे

अर्थात् त्याच्या पुण्याचा जर लाभ करून घेतला नाहीं, तर देवाचे चरणहीं लाभावयाचे नाहींत. ह्मणून आपल्या सर्व कर्मांचा भरंवसा सोडा आणि नित्य देवाजवळ प्रार्थना करा कीं, "हे देवा आकाश व पृथ्वी यांच्या निर्माणकर्त्या आणि नियंत्या आपल्या पुत्राचें पुण्य देऊन माझें सर्व पाप हरण कर आणि आपला पवित्र आत्मा माझ्याठायीं पाठवून माझें हृदय स्वच्छ आणि शुद्ध कर." तथास्तु.

समाप्त.